दैनिक
Page 2
# जनप्रभात

# मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नागपूर ■ दिलीप येवले**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणेबाबतची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. अटी व शर्तीप्रमाणे मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी पात्र ठरलेल्या बचत गटांना ट्रॅक्टरचे वाटप करण्यात येणार असून या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हयातील इच्छुक स्वयंसहाय्यता बचत गटांनी प्रत्यक्ष समाज कल्याण कार्यालयात येऊन अर्ज घेत विनाविलंब १५ जुलैपर्यंत कार्यालयीन वेळेत अर्जात नमुद पत्यावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागाशी संपर्क साधावा.